लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,लातूर

दिनांक १७/०१/२०१९

## प्रेसनोट

**आरोपी लोकसेवक धनंजय पांडुरंग पवळे वय ५६ वर्षे पद अव्वल कारकुन, नेमणुक– भुसंपादन विभाग, उप विभागीय अधिकारी कार्यालय, अहमदपुर जि.लातूर यांनी ५०००/रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ४०००/ रुपये लाच स्वीकारली.**

यातील मुळ तक्रारदार यांच्या तळयात गेलेल्या वादग्रस्त जमिनीचा दुस–याच्या नावे मंजुर होवुन आलेला मावेजा (मोबदला) प्रकरणातील अर्जावर निकाल देवुन अंतिम निर्णयासाठी प्रकरण दिवाणी न्यायालयात वर्ग करणेसाठी ५०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ४०००/– रुपये घेण्याचे मान्य करुन सदर लाचेची रक्कम आज दिनांक १७/०१/२०१९ रोजी १४.२० वाजता भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, अहमदपुर येथील व्हरांडयात पंचासमक्ष स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन अहमदपुर जि. लातूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर सापळा मा. पोलीस अधिक्षक श्री. संजय लाटकर लाप्रवि नांदेड परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणिक बेद्रे, पोलीस निरीक्षक वर्षा दंडीमे पोलीस निरीक्षक कुमार दराडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर यांनी आयोजीत केला. सापळा यशस्वी होण्यासाठी पोहेकॉ संजय पस्तापुरे, व्यकंट पडीले, पोना लक्ष्मीकांत देशमुख, चंद्रकांत डांगे, पोकॉ मोहन सुरवसे, नानासाहेब भोंग, शैलेश सुडे, विष्णु गुंडरे, सचिन धारेकर, दत्ता विभुते, प्रदिप स्वामी, मपोना शिवकांता शेळके व चालक पोना महाजन यांनी परिश्रम घेतले.

पुढील तपास पोलीस निरीक्षक कुमार दराडे हे करीत आहेत.

शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर **कृपया मा. श्री.संजय लाटकर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड. यांचा भ्रमणध्वनी क्र. ९९२३०२८१२२ या क्रमांकावर** व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर कार्यालयाचे खालील क्रमांकावर संपर्क करावा असे जाहीर आवाहन पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांनी केले आहे.

**भ्रमणध्वनी क्रमांक : 9923666644, 9422242080, 9657709841**
**दूरध्वनी क्रमांक : 02382-242674**
**टोल फ्री क्र. : 1064**
**ईमेल आयडी : dyspacblatur@gmail.com**

सविनय सादर

(माणिक बेद्रे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,लातुर

पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन कार्यालय लातूर

कार्यालयीन संपर्क पत्ता:–
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,लातुर
जुने जिल्हाधिकारी, कार्यालय कॅम्पस, रजिस्ट्री ऑफिस चे बाजुस लातुर

Scanned by CamScanner